
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 12 | ISSUE - 4 | JANUARY - 2023

# संत एकनाथांच्या भारुडांतील रूपकसृष्टी

नितीन रंगनाथ आवताडे

## प्रास्ताविक




'भारुड' हा प्राचीन मराठी साहित्यातील लोकप्रिय असा प्रायोगिक कलाप्रकार आहे. मध्ययुगीन भक्ती परंपरेतील महानुभाव संप्रदाय, दत्त संप्रदाय, वारकरी संप्रदाय अशा विविध संप्रदायांनी भारूड या लोकगीत प्रकाराला अध्यात्म तत्त्वप्रतिपादनाच्या हेतुने हाताळले आहे. वारकरी संप्रदायाच्या वाङ्मयपरंपरेमध्ये भारुडांची निर्मिती संत ज्ञानेश्वरांपासून झालेली आढळते. याच परंपरेमध्ये संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा इत्यादी संतांनी भारूडांचे लेखन केले. यापैकी बहुविध स्वरुपातील भारुडाचे लेखन करणारे संत एकनाथ यांनी जवळपास ३५० पेक्षा अधिक भारुडांची रचना करून 'भारुड' या वाङ्मय प्रकाराला नावलौकिक प्राप्त करून दिला. गेयस्वरूप, संगीतप्रदान, रंजनात्मक व लोकप्रबोधनात्मक असे बहुआयामी स्वरूप असणारे भारूड त्यांनी निर्माण केले. अनेकविध पैलूंनी नटलेल्या अशा या भारूडाला मध्ययुगीन कालखंडाच्या सोळाव्या शतकात संत एकनाथांनी विशिष्ट उंचीवर नेले व प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. तत्कालीन समाजाच्या तळागाळातील अडाणी व ग्रामीण समाजस्तरापर्यंत भागवत धर्माच्या भक्तीचा प्रवाह पोहोचविण्याचे माध्यम म्हणून एकनाथांनी भारूडांच्या रचना केल्या व त्याद्वारे समाजाला मधुराभक्तीचा अनुभव घडविला. भक्तिरसाचा परिपोष करण्याबरोबर भारुडांच्या लोककलाप्रधान आविष्कारातून लोकरंजन, लोकप्रबोधन आणि वैश्विक जीवनमूल्यांची ओळख करून देणे अशा बहुविध हेतुंना पूर्ण केले. लोकशिक्षण घडविणारा गूढ आशय, कूटात्मक रचनाबंध, नाट्य, नृत्य व संगीत आदींचा औचित्यपूर्ण समन्वय यामुळे एकनाथांची भारुडे समाजप्रबोधनाची प्रभावी माध्यम म्हणून लौकिक प्राप्त करणारे लोकसांस्कृतिक संचित सिद्ध झाले. अल्पाक्षररमणीयत्व, द्वयर्थी शब्दरचना, मार्मिक व अचूक भाषावापर, गूढार्थ व्यक्त करणारी भाषा प्रयोग, वास्तवाचा स्पर्श असणारी परखड व रोखठोक मांडणी, मराठी भाषेसोबतच हिंदी, कन्नड, तेलगू, फार्सी, संस्कृत आदी भाषांमधील शब्दप्रयोगातून आलेले बहुभाषित्व, संवादमय भाषेचे प्राबल्य, बोलींचे औचित्यपूर्ण प्रयोजन इत्यादी भाषिक विशेषांचा प्रत्यय नाथांच्या भारुडांमधून घडतो. आध्यात्मिकतेचे अधिष्ठान असणारे नाथांचे भारूड हे कल्पकता, प्रतिकात्मकता, रूपकात्मकता, सृजनात्मक संरचना, शब्द स्तरावरील चमत्कृती, नादानुकारित्व व लयबद्धता, अलंकारसौष्ठव, वाक्यस्तरांवरील सरंचनात्मक सौंदर्य इत्यादी औचित्यपूर्ण शैलीविशेषांनी नटलेले रसगर्भ लेणे असल्याचे दिसतात. त्यातील द्वयर्थी भाषिक वापरामुळे आध्यात्मिकता व लौकिक जीवनाशी सुमेळ साधणाऱ्या अशा लोकभाषेचा अनुभव घडविणारे भारूड हे जानपद काव्य म्हणून मराठी साहित्यामधील नाथांचे अप्रतिम योगदान ठरते.

मध्ययुगीन कालखंडातील प्रतिकूल राजकीय सत्तांच्या काळामध्ये समाजाच्या दुर्लक्षित व अज्ञानी घटकांना बोधाचे बाळकडू त्यांना समजेल–उमजेल अशा लोकभाषेत देण्याचे काम नाथांनी भारुडांच्या माध्यमातून समर्थपणे पार पाडले आहे. त्यांच्या 'चतुःश्लोकी भागवत', 'शुकाष्टक', 'हस्तामलक', 'आनंदलहरी', 'स्वात्मसुख', 'रुक्मिणीस्वयंवर', 'भावार्थ रामायण', 'अनुभवामृत', 'आनंदानुभव', 'चिरंजीवपद', 'गीतासार', 'संत चरित्रे', 'अभंगरचना' यासारख्या विपुल वाङ्मयासोबतच त्यांनी आगळ्यावेगळ्या अशा भारुडांची निर्मिती करून वाङ्मयीन विश्वाला समृद्धता बहाल करण्याचे काम केले आहे. त्यांच्या अन्य वाङ्मय संपदेपेक्षा भारुडांची रचना विशेष उल्लेखनीय ठरते त्याची अनेक कारणे असून त्यापैकी भारुडांच्या ठायी असणारा लोकशिक्षणाचा हेतू, प्रायोगिक मूल्य, बोलींचे प्राबल्य, बहुभाषिक उपयोजन, देशीयतेच्या तत्त्वांचा आविष्कार, लोकसांस्कृतिक

परिघातील भारूडांचे स्थान, आशय–विषयाचे वैविध्य इत्यादी महत्त्वाची कारणे आहेत. या सर्व कारणांसोबतच एकनाथांच्या भारुडांमधून आढळून येणारे अलंकार उपयोजनाचे वैपुल्य भारुडांना भरीव वाङ्‌मयीन मूल्य प्रदान करण्याचे काम करते. त्याचबरोबर भारुडांना अधिक सकस, आकर्षक व मूल्यगर्भ बनविण्याचे काम देखील करते. एकनाथांनी निर्मिलेल्या 'वासुदेव', 'भराडी', 'गोंधळी', 'भुत्या', 'पोतराज', 'जोशी', 'दरवेशी', 'पिंगळा', 'कोल्हाटी', 'जोगी', 'जागल्या' इत्यादीसारख्या लोकसंस्कृतीतील उपासकांच्या नामाभिधानाने केलेल्या भारुडांच्या रचना विशेष प्रसिद्ध आहेत. त्याचबरोबर लोकजीवनातील 'शिमगा', 'होळी', 'गोंधळ' यासारखे लोकसण, उत्सव, प्रथा, परंपरा तर 'विंचू', 'पोपट', 'एडका', 'सर्प' यासारख्या प्राण्यांच्या नावाने भारुडांची रचना उल्लेखनीय आहेत. ज्याद्वारे लोकसंस्कृतीचे उपासक, प्राणी, पक्षी, सण, व्यवहार, लोकप्रथा, परंपरा इत्यादींचा पारमार्थिक व लौकिक जीवनाचा अन्वयार्थ दर्शविण्यासाठी रूपकात्मक वापर करण्याचे कौशल्य नाथांनी भारुडांमधून साधले आहे. त्यासाठी शब्दालंकार व अर्थालंकार या दोन्ही प्रकारातील उपमा, उत्प्रेक्षा, श्लेष, अनुप्रास, यमक, रूपक, वक्रोक्ती, दृष्टांत इत्यादी अलंकारांचा विपुल वापर एकनाथांनी भारुडांमधून केला आहे. त्यापैकी 'रूपक' या अलंकाराचे प्राबल्य विशेषत्वाने दृष्टीस पडते. या रूपक अलंकाराच्या प्रयोजनातून निर्माण होणारी रुपकात्मकता नाथांच्या भारुडांचे महत्त्वाचे शैलीविशेष ठरते. या रुपकात्मकतेचा परामर्श आपण प्रस्तुत शोधनिबंधद्वारे घेणार आहोत.

## नाथांच्या भारुडातील रूपक या अर्थालंकाराचे उपयोजन

संत एकनाथांनी भारुडासारखा लोकगीतप्रकार बहुआयामी रूपामध्ये साकारला. त्याचे विविध आयाम म्हणजेच त्याला रंजकतेची किनार आहे. त्याचबरोबर त्यामध्ये आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचे व लौकिक जीवनमूल्याचे सार अंतर्भूत आहे. हे पारमार्थिक तत्त्वज्ञान व जीवनमूल्यांचा गंभीर गर्भिताशय रूपकाश्रय घेत रंजकपणे विशद करण्याचे काम भारुडाच्या माध्यमातून एकनाथांनी केले आहे. त्यामुळेच याविषयी वा. ल. कुलकर्णी लिहितात की, ''रंजन आणि उद्‌बोधन साधण्यासाठीच (एकनाथांच्या) भारुडाची रचना आहे.''[१] भागवत धर्माचे तत्त्वज्ञान केंद्रवर्ती ठेवून समाजाच्या तळागाळातील ग्रामीण अज्ञजनांना समजेल–उमजेल अशा पद्धतीने मांडण्याचे काम केले आहे. या भारुडांमधून मनोरंजन होत असताना समांतरपणे आध्यात्मिक विचार व लौकिक जीवनातील विचारदृष्टी बहाल करण्यात आली. हे करण्यासाठी 'रूपक' या अलंकाराचा यथोचित वापर करीत नाथांनी जवळपास सर्व भारुडांमधून रूपकात्मकतेचा आश्रय घेत संरचना साकारल्या. त्यामुळे रूपकात्मकतेचा परामर्श घेत असताना नाथांच्या भारुडांमधून असंख्य उदाहरणे आढळून येतात.

संत एकनाथ आपल्या भारुडांमधून प्रामुख्याने अनुप्रास, यमक, श्लेष, वक्रोक्ती हे शब्दालंकार वापरतात. ज्यामुळे भारुडांना गेयता, तालबद्धता आणि लयबद्धता प्राप्त होताना दिसते तर रूपक, उत्प्रेक्षा, अन्योक्ती, अतिशयोक्ती, दृष्टांत इत्यादी अर्थालंकार वापरतात ज्यामुळे भारुडांच्या आशयामध्ये गहनता, रंजकता आणि गूढता निर्माण होण्याचे काम घडताना दिसते. अर्थाचे अनेकविध पैलू अध्याहृत होण्याची प्रक्रिया या अर्थालंकाराच्याद्वारे घडून आलेली दिसते. तसेच उपमेय–उपमानाच्या उपयोजनातील साधर्म्य–वैधर्म्याचे चमत्कृतीपूर्ण व अर्थपूर्ण प्रयोजन हे भारुडांच्या लेखनातील अलंकाराचे सूक्ष्म विशेष ठरते. मुख्यत्वे अर्थालंकारामध्ये अर्थाच्या मुळाशी असणारे उपमेय व उपमान यातील साधर्म्य व वैधर्म्य व्यक्त केलेले असते ज्याद्वारे अर्थपूर्ण चमत्कृतीतून काव्यरचना बहारदार होत असते. अशाप्रकारचे उपमेय व उपमानाच्या उपयोजनातील साम्य–भेदाचे चमत्कृतीपूर्ण व अर्थपूर्ण प्रयोजन नाथांच्या भारुडांचे विशेष आहे. नाथांनी वैचित्र्यपूर्ण व चमत्कृतीपूर्ण वाटणारी काव्यरचना अर्थांच्या साधर्म्य–वैधर्म्यातून आविष्कृत करण्याचे काम प्रभावीपणे केले आहे. त्याचबरोबर उपमेय व उपमानामध्ये अभिन्नत्व दर्शविणाऱ्या रूपक अलंकाराचा वापर देखील विपुलप्रमाणात केला आहे.

प्रामुख्याने दोन वस्तुतील अभिन्नत्व अथवा एकरूपत्व कथन करण्यासाठी रूपक अलंकाराचा वापर केला जातो. रूपकामध्ये उपमानाचा उपेमयावर आरोप केलेला असतो. उपमेय व उपमान हे अभिन्न दर्शविणारा असा हा अलंकार आहे. त्याचे प्रामुख्याने (१) सांग रूपक, (२) निरंग रूपक व (३) परंपरित रूपक असे तीन प्रकार मानण्यात येतात. यापैकी सांग रूपकामध्ये एखादी वस्तू आणि तिची अंगे यांच्यावर उपमान वस्तू आणि तिची अंगे यांचे वेगवेगळे आरोप केलेले असून मुख्य वस्तूवरील आरोप प्रधान असतो व अंगावरील आरोप गौण असतो, तेव्हा 'सांग रूपक' होते. निरंग रूपकामध्ये वर्णनातील प्रत्येक अंगाची रूपके न साधता एक किंवा अधिक प्रधान रूपके साधली जातात तर परंपरित रूपकामध्ये एक रूपक साधल्यावर दुसरे रूपक सिद्ध होते किंवा रूपक दुसऱ्या रूपकाचे कारण होते आणि कारण रूपक गौण असून कार्य रूपक प्रधान असते. अशा रूपकाला 'परंपरित रूपक' म्हणतात. अशा रूपक अलंकारांच्या तीनही प्रकारांचा वापर संत एकनाथांनी आपल्या भारूड रचनांमधून केलेला दिसून येतो. परिणामी संत एकनाथांची जवळपास सर्व भारुडे ही रूपकाश्रयी बनलेली आहेत. सांग रूपकाचे उपयोजन पाहताना आपण नाथांच्या रचनांमधील 'किल्ला' या भारुडाचे उदाहरण पाहू शकतो. ज्यामध्ये ते लिहितात की,

''धुम धुम बार उडविला । ऐसा मनीम कोण आला ।
त्यांनी किल्ल्यासी वेढा दिला । तो आज ऐकिला ।।
राजा पुसे प्रधानाला । का रें कशाचा आवाज आला ।
वेढा फौजेचा पडला । कसा वांचवीन जीवित्वाला ।
कोण सांभाळील या किल्ल्याला । किल्ल्याचा पहिलाच पाया पडला ।
खबर नाहीं पायदळाला । तोफेचा म्होरेस्वार गेला ।।
तोफा लावून चाल्ही कोन । चाऱ्ही बुरूज गेले पडून धुगधुगीत राजाचे मन ।
मग कशास हो हैराण ।। यम चोपदार नेती बांधोन ।
सहस्त्र अंगा लावोन । तप्त अर्गळा मुखी घालून ।
तप्त भूमीवर चालवून । सुळी दिला राजा जाण ।।''[२]

अशाप्रकारे या भारुडातून सांग रुपकाचा वापर करीत संत एकनाथ शरीररुपी किल्ल्याचा पाडाव कशाप्रकारे होतो याचे वर्णन करतात. त्यांनी मानवी देहावर किल्ल्याचा आरोप करून ते प्रधान अंग असे वर्णन केले आहे व रूपक साधले आहे. 'वेढा', 'तोफा', 'तप्त अग्नी', 'म्होरेस्वारी' ही उपमाने म्हणून उपयोजिली आहेत.

रूपक अलंकाराचे प्रयोजन करताना संत एकनाथ अशाप्रकारची अनेक उपमेय व उपमाने अवलंबतात तसेच अव्यक्तावर व्यक्ताचा आरोप करीत काव्यरचना करण्याचे काम करतात. अचेतनावर सचेतनाचा आरोप करताना नावीन्यपूर्ण शब्दांची निर्मिती ते साधतात. एकनाथांच्या भारुडांतील रूपकविश्वाचा वेध घेताना आपल्याला विशेषत्वाने त्यांच्या भारुडांमधील उपयोजिलेल्या रूपकयोजनेतील सृजनशीलता व कल्पकता यांच्या व्यापकतेचा प्रत्यय येतो. त्यामुळे रूपक योजनेतील वैचित्र्यपूर्ण कल्पकतेचा प्रत्यय देणारी शैली हे नाथांच्या भारूडांचे शैलीविशेष ठरते. ''कृष्णा एक पांखरूं आहे । ते मुखावीण चारा खाय रे ।।''[३] यासारख्या रचनांमध्ये 'पाखरू मुखाशिवाय चारा खाणे' या चमत्कृतीपूर्ण व वैचित्र्यपूर्ण अशा अलंकारांच्या लक्षणांना कल्पकतेच्या जोरावर आविष्कृत करतात. त्याचबरोबर नाथांच्या भारुडामधील रूपकांची उदाहरणे पुढीलप्रमाणे अधोरेखित करता येतात. 'अहंकार सासरा', 'कल्पना सासू', 'संदेह श्वान', 'प्रपंचाचे ताक', 'वासनेच्या बिडालिका' 'लिंगदेह घोंगडी', 'लोभसर्प', 'आशा लहरी', 'तृप्ती वारा', 'विकल्प वासनेच्या मुंग्या', 'सद्गुरू गारुडी', 'वैराग्य पाणी', 'अहं विंचू', 'विवेकाचे खुरपे', 'आत्म फळ', 'आत्मनिवेदन रोडगा', 'विवेक खुंटा', 'प्रेमाचा खुळखुळा', 'वैराग्य जाते', 'बोधाचे कुंकू', 'ज्ञानाचा संबळ', 'ज्ञान दिवटी', 'भजन गूळ', 'विषयाचे सासर', 'प्रपंच लुगडे', 'विषय उंडी', 'अहंभाव भ्रतार', 'ज्ञान दिवटी', 'कल्पना सासू', 'दंभ सासरा', 'शांती गाय', 'नामाचा चौघडा', 'विवेकाचे खुरपे', 'त्रिगुणाच्या वाती', 'भक्तीचा फुलवरा', 'बोधाचा झेंडा', 'मन घुंगरू', 'मनोविकाराची कुर्वंडी' इत्यादी रूपकात्मक शब्दांना ते वापरतात. अशाप्रकारच्या रूपकांच्या आश्रयानेच नाथांनी भारुडांमध्ये जिवंतपणा निर्माण करण्याचे काम केले. त्याचबरोबर त्या त्या भारुडातील आशय-विषय, पात्रे, प्रसंग आदींना मूर्तरूप व चित्रमयता बहाल करण्याचे काम केले आहे. त्यामुळेच अरुण अभ्यंकर यांनी ''ह्या रूपकांच्या साहाय्यानेच त्यांनी भावचित्रणे आणि व्यक्तिचित्रणे अगदी मोजक्या शब्दांत निर्माण केली.''[४] असे मत मांडले आहे. भारुडातील अशा रूपक योजनेचे स्वरूप हे अत्यंत मार्मिक आणि गर्भिताशयाला अचूक सूचित करणारे आहे. अल्पाक्षररमणीत्व हा शैलीविशेष नाथांच्या रूपकयोजनेतून अधिक प्रभावीपणे आकारास आलेले यावरून स्पष्ट होते. पात्रांना आणि प्रसंगांना अधिक खुलविण्यासाठी व त्यांचे अचूक दृकप्रत्ययी चित्रण करण्यासाठी रूपकांचा औचित्यपूर्ण वापर नाथांनी केलेला दिसून येतो. ज्यातून लौकिक जीवनातील घटकांना रूपकात्मकतेचे वलय प्राप्त करून देत आध्यात्मिक ज्ञान विशद करण्याचे काम केले आहे. भारुडातील आशय, विषय, पात्ररचना यांच्या अनुषंगाने पूरक अशी रूपक योजना करून एकनाथ उपमानाच्या वैविध्यपूर्ण प्रयोगातून त्याला भारदस्त रूप प्रदान करतात. व्यवहारविश्वातील उपमानांचा वापर करून आध्यात्माचे गूढ उकलण्यासाठी नाथांनी केलेला हा उपमानप्रपंच त्यांच्या काव्यातील अलंकारसृष्टीला बहारदार करण्याचे काम करताना दिसतो. ओघाने काव्याच्या एकंदरित भाषेला उच्चस्तर व विलोभनीयता प्राप्त करून दिलेली दिसते. ज्याप्रमाणे मिलिंद मालशे लिहितात की, ''काव्याची स्वतःची अशी काव्यात्म शब्दकळा असते, असे मानणे होय. अपरिचित शब्द, अलंकार इत्यादी वापरून काव्याची भाषा सर्वसामान्य, गद्यप्राप्य भाषेपासून उंचावली जाते.''[५] या मताप्रमाणे नाथांच्या रूपक अलंकाराच्या प्रयोजनातून निर्माण झालेल्या रूपकात्मकतेमुळे एकूणच भारुड या काव्याच्या भाषेला एक विशिष्ट उंची व आगळेवेगळे आकर्षक रूप प्राप्त झाले आहे.

मध्ययुगीन कालखंडातील मुस्लिम सत्तांच्या प्रतिकूल राजकीय व सामाजिक अराजकतेच्या पार्श्वभूमीवर सामाजिक प्रबोधनाचे काम करताना नाथांनी भारुडांमध्ये रूपकाश्रय घेत सामाजिक विषयांना अचूक वाचा फोडली आहे. उदा. 'बये दार

उघड' यासारख्या भारुडामधून समाजातील अनिष्ठ घटकांना उद्धृत करीत अन्याय, अत्याचार, सामाजिक विमनस्कता, विषयवासना इत्यादींना समूळ नष्ट करण्यासाठी गाऱ्हाणे घालणारे भारूड निर्माण केले आहे. यामधून सगुण-दुर्गुण घटकांना रूपकात्मकतेतून विशद केले व मनामध्ये समाजाप्रती असणाऱ्या सुधारणावादी विचारांना व्यक्त केले आहे. दैवीशक्तीला आवाहन करून समाजाच्या हितासाठी प्रकट होण्याचे व सगुणाचे दार उघडण्याचे आवाहन करणारा 'पोतराज' हा रूपकात्मकतेतून प्रत्ययास येतात. याठिकाणी पात्रनिर्मितीमध्ये रूपकात्मकतेचा अवलंब करून नाथांनी वेगळेपण निर्माण केले आहे. या भारुडातील पोतराज म्हणतो की,

''सितेचेनि कैवारें । रावण माहिरला सपरिवारें ।।
अठरा पद्म वानरे । गोंधळ मांडिला लंकेसी ।।
सागर बांधेनिया शिळीं । करिसी लंकेची होळी ।
रावण कुंभकर्ण घेसी बळी । खेळसी शिरांची चेंडूफळी ।
बया दार उघड, दार उघड ।।
कलीचा प्रथम चरण । दैवते राहिली लपून ।
तीर्थे सांडिले महिमान । अठरा वर्ण एक झाले ।
म्लेंच्छे गांजिले देवभक्ता । महिमा उच्छेदिला सर्वथा ।
न चले जपतप तत्त्वता । एकरूप सर्व झाले ।।
बया दार उघड, दार उघड ।।
अर्जुनरथी स्वार होवून । वाग्दोर हाती धरूनी ।
रथ फिरविसी कवतुकें । बया दार उघड ।''[६]

अशाप्रकारे 'लंकेची होळी', 'शिरांची चेंडूफळी', 'कलीचा प्रथम चरण', ही रूपके तसेच गाऱ्हाणे गाणारा पोतराज ही सर्व रूपकात्मकतेतून अवतरलेली दिसतात. याचप्रकारची नाथांची अन्य समाजहिताची गाऱ्हाणी गात अज्ञानाचा अंधकार नष्ट करण्याची व ज्ञानाची ज्योत पेटविण्याची इच्छा व्यक्त करणारी 'गोंधळी', 'पांगळा', 'भुत्या', 'वासुदेव' इत्यादी लोकदैवतांची भगतरुपी प्रतिकात्मक पात्रे रूपकाद्वारे साकारण्याचे कौशल्य नाथांनी भारुडांमधून साधले आहे.

संत एकनाथ आपल्या भारूड रचनांमधून रूपकांची निवड करताना विषयाच्या अनुषंगाने निवडलेल्या घटकांच्या संलग्न बाबींचे आरोप त्या व्यक्ती अथवा वस्तूवर करतात. खेळ अथवा सणांच्या अनुषंगाने निर्मिलेले भारूड त्या खेळातील अथवा सणातील वस्तू, क्रिया, अथवा प्रथा-परंपरांचे आरोप करून साकारतात. उदा. 'चौघड' या विषयावर भारूड रचना करताना त्यासाठी 'सनई', 'तुतारी', 'झांज', 'मोगरी' यासारख्या वाद्यांची रूपके निर्माण करतात. अशाप्रकारच्या रूपक निवडीतून त्या त्या विषयाचे आकलन व सहसंबंध जोडणे वाचकांना व श्रोत्यांना सहजसाध्य होते. याप्रकारच्या भाषासौंदर्य खुलविणाऱ्या रूपकात्मकतेचे नाथांनी चपखलपणे विपुल प्रमाणात उपयोजन करून भारुडांचा रसपरिपोष करण्याचे काम केले आहे. मूलतः काव्यामध्ये रंजकता आणि सौंदर्य निर्माण करण्यासाठी अलंकारांचा वापर केला जातो. या तत्त्वास अनसरून एकनाथांनी भारुडांमध्ये ओतप्रोत भरलेली रंजकता याच अलंकारांच्याद्वारे समृद्ध केलेली दिसते. तसेच भारुडातील प्रबोधनात्मकतेला विशिष्ट परिमाण प्राप्त करून देण्यासाठी देखील नाथांनी रूपकात्मकतेचा यथोचित वापर केलेला दिसतो. ग्रामीण व अज्ञानी लोकांसाठी अनाकलनीय असणारे आध्यात्म विशद करताना व लौकिक जीवनमूल्यांना देशीयतेच्या तत्त्वांनी आविष्कृत करताना नाथांनी रूपकासारख्या अलंकारांचा वापर केलेला आहे. अलंकाराद्वारे काव्याची केवळ शोभा वाढविणे हा हेतू न बाळगता त्यांनी आशयाभिव्यक्तीच्या स्पष्टतेसाठी आणि आकलनाच्या सुलभतेसाठी देखील रूपकांना उपयोजिलेले दिसून येते. गूढार्थ समजावून सांगणे अथवा भागवतधर्माचे तत्त्वज्ञान विशद करणे यासाठी भारुडांसारख्या लोककाव्यामधून विविध अलंकारांची चपखलपणे योजना केलेली आहे. ''काव्य नाटक अलंकार करिती । ते कवित्वाची साधन मानिती ।।''[७] अशाप्रकारची अलंकारांना साधन मानून कवित्व करण्याची भूमिका असणारे संत एकनाथ भारुडांमधून रूपकात्मकतेचा अभूतपूर्व अनुभव समर्थपणे देताना दिसतात.

## समारोप

सारांशरुपाने असे म्हणता येते की, संत एकनाथांनी भारूड रचनांद्वारे रूपकात्मकतेचे व्यापक दालन मराठी वाङ्मयविश्वाला बहाल केले आहे. संत एकनाथांनी भारूडांच्या रचनांमधून अनुप्रास, यमक, श्लेष, वक्रोक्ती हे शब्दालंकार व

उपमा, रूपक, उत्प्रेक्षा, अन्योक्ती, अतिशयोक्ती, दृष्टांत हे अर्थालंकार यांचा औचित्यपूर्ण आणि अभूतपूर्व वापर केला आहे. ज्यामुळे पारमार्थिक आशयाला अचूक परिमाण प्राप्त करून देण्यात भारुडे कमालीची सिद्ध झाली आहेत. रूपकांसारख्या अलंकारांचे प्राबल्य भारुडांना आशय आणि आविष्कार शैलीला एकसंधता प्राप्त करून देताना दिसतात. लोकगीत व लोककलाप्रकार असणाऱ्या भारुडांना अधिक गहन, आकर्षक व चित्तवेधक करताना रूपकांचा यथासांग वापर करून कौशल्याने मांडणी केली आहे. भागवत धर्माचे आध्यात्मिक तत्त्वज्ञान विशद करण्यासाठी आणि लौकिक जीवनातील वैश्विक मूल्यांचे कथन करण्यासाठी भारुडांमधून रूपकाश्रय घेतला आहे. ज्यामुळे रंजनप्रदान भारुडांना अधिक सकसपणा व लोकमानसाचा अचूक वेध घेण्याची क्षमता अधिक प्रगल्भपणे सिद्ध झालेली दिसते. समाजजीवनातील सर्वसामान्यांच्या परिचयाची असणारी पात्रे, वस्तू, प्राणी, निसर्गघटक इत्यादींच्या आधारे रूपकांना अधिक जिवंतपणा व अस्सलपणा बहाल केला आहे. जो मानवी मनावर अधिक सखोल परिणाम करण्यात यशस्वी झाला आहे व नाथांचे आध्यात्मिक व लौकिक प्रबोधनाचे कार्य यशस्वी झाले आहे. जीवनसंस्कृती, कृषिसंस्कृती, लोकसंस्कृती, भावाविष्कार, मधुराभक्तीचा आविष्कार, लौकिक जीवनानुभूती यांना आविष्कृत करण्यासाठी रूपकात्मकतेचा अवलंब करून नाथांनी भारुडांना गूढ आशयप्रदान, सकस आणि बहारदार करण्याचे काम केले आहे. शब्दशक्तींचा वापर करून अभिधा, लक्षणा आणि व्यंजना यांना एकरूपत्व बहाल करीत भारुडातील अर्थाची वलये निर्माण केली आहेत. ही वलये उलगडत जाताना आध्यात्माचे गूढ तत्त्वज्ञान, लौकिक जीवनाची सखोल मूल्ये व काव्यरसाचे आविष्कार प्रत्ययास येत जातात. जी रूपकात्मतेची फलित म्हणून समोर येतात व भारुडांना बहुविधस्तरीय उंची प्राप्त होते. नाथांनी साकारलेली रूपके त्यांच्या आध्यात्मिक व व्यवहारविश्वातील मांडणी अधिक ठळक, रसरशीत, अस्सल आणि जिवंतपणा प्राप्त करून देणारी मौलिक रत्ने ठरतात.

## संदर्भ

१. कुलकर्णी, वा. ल. : एकनाथी भारुडे : काही विचार, वि. भि. कोलते गौरवग्रंथ, पृ. ६७
२. जोशी, का. अ. (संपा.) : श्री एकनाथ गाथा, अभंग क्र.३८३६
३. उनि, अभंग ३७७९
४. अभ्यंकर, अरुण बाळकृष्ण : एकनाथी भारूड, एकनाथ दर्शन, खंड पहिला, मे. शारदा साहित्य, पुणे, पृ.२४०
५. मालशे, मिलिंद : आधुनिक भाषाविज्ञान : सिद्धांत आणि उपयोजन, लोकवाङ्मयगृह, मुंबई, आ. चौथी, २००९, पृ. १७९
६. तत्रैव, श्री एकनाथ गाथा, अभंग ३८२१
७. पांगारकर, ल. रा. (संपा.) : श्री एकनाथी भागवत, अध्याय १४, अभंग क्र.६६